# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

**संपादक**
डॉ. अशोक ढवळे

**संपादक मंडळ**
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

**मुद्रक/प्रकाशक**
डॉ. अशोक ढवळे

**अक्षरजुळणी**
आत्माराम पडवळ

**मुखपृष्ठ व मांडणी**
केतन शिंदे

**व्यवस्थापक**
चंद्रकांत शिंदे

**प्रसिद्धी स्थळ**
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


# पक्षाच्या राज्य कमिटीची हाक
# दुष्काळ, जवखेडा प्रश्नांवर रान उठवा! पक्ष अधिवेशने सर्वार्थाने यशस्वी करा!

**डॉ. अशोक ढवळे**

७ नोव्हेंबर २०१४ रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली आणि रशियातील महान समाजसत्तावादी क्रांतीला ९७ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना राज्य कमिटीने सर्वप्रथम क्रांतिकारी अभिवादन केले.

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाचे राज्य सचिवमंडळ सदस्य जे. पी. गावीत हे नाशिक जिल्ह्याच्या कळवण मतदारसंघातून विजयी झाले आणि १९७८ पासून विधानसभेची निवडणूक त्यांनी सातव्यांदा जिंकली. सर्व आमदारांना शपथ देण्यासाठी विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणूनही त्यांची निवड झाली आणि ती जबाबदारी त्यांनी उत्तमरित्या पार पाडली. पक्षाच्या राज्य कमिटीतर्फे निवडणुकीतील विजयाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आणि सीताराम येचुरींच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ देण्यात आला. ३१ ऑक्टोबरला कळवणला झालेल्या त्यांच्या जोमदार विजय सभेत सीताराम येचुरी व डॉ. अशोक ढवळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पक्षाच्या राज्य कमिटीची बैठक दि. ४-५ नोव्हेंबर २०१४ रोजी बेलापूर येथे, आणि राज्य सचिवमंडळाची बैठक त्यापूर्वी दि.३ नोव्हेंबर रोजी वरळी येथे पार पडली. सीताराम येचुरी आणि निलोत्पल बसू बैठकींना हजर होते. राज्य कमिटीच्या अध्यक्षस्थानी यशवंत झाडे हे होते.

## श्रद्धांजली

कॉ. विनय कोनार (प. बंगाल), कॉ. विजेंद्र शर्मा (दिल्ली), कॉ. गुणाजी गावीत (नाशिक), कॉ. विठ्ठल पळसकर (अमरावती), कॉ. बापू दत्तवाडे (कोल्हापूर), कॉ. सखाराम देशमुख (मुंबई), कॉ. हेमांगी महाबळेश्वरकर (सातारा), साहित्यिक यु. आर. अनंतमूर्ती, इतिहासकार बिपन चंद्र, अभिनेता सदाशिव आमरापूरकर, जवखेडा दलित हत्याकांडाचे बळी, जम्मू-काश्मीर आणि आंध्र प्रदेशमधील महापुराचे बळी या सर्वांना राज्य कमिटीने भावपूर्ण आदरांजली वाहिली.

## पक्षाच्या केंद्रीय कमिटीचे रिपोर्टिंग

२६ ते २९ ऑक्टोबर रोजी दिल्लीत झालेल्या केंद्रीय कमिटी बैठकीचे रिपोर्टिंग सीताराम येचुरी यांनी केले व त्यावर प्रश्नोत्तरे झाली.

## दोन ज्वलंत प्रश्न : भीषण दुष्काळ आणि जवखेडा दलित हत्याकांड

या दोन्ही प्रश्नांवर राज्य कमिटीत चर्चा होऊन त्यावर तीव्र आंदोलने करण्याचे ठरले. महाराष्ट्र लोकशाही समितीतर्फे जवखेडा दलित हत्याकांडाच्या निषेधार्थ आणि या हत्याकांडाच्या आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना कठोर शिक्षा देण्याच्या मागणीवर १२ नोव्हेंबरला मुंबईत धरणे आंदोलन झाले. राज्यात ठिकठिकाणी निषेध निदर्शने व मोर्चे झाले. २८ नोव्हेंबरला महात्मा जोतीराव फुले स्मृतिदिनी मुंबईत एक विशाल राज्यव्यापी मोर्चा काढण्याचे समितीतर्फे ठरले. त्यात राज्यभरातील

कार्यकर्त्यांनी चांगल्या संख्येने सहभाग करावा, असे राज्य कमिटीने आवाहन केले.

महाराष्ट्राचा मोठा हिस्सा आज भीषण दुष्काळात होरपळत आहे. त्यात मराठवाड्याचा बहुसंख्य भाग, तसेच विदर्भ व इतर विभागांच्या काही भागाचाही समावेश आहे. या प्रश्नावर १५ नोव्हेंबरला मराठवाड्यात परभणी येथे आणि १६ नोव्हेंबरला विदर्भात वर्धा येथे किसान सभा आणि शेतमजूर युनियनच्या कार्यकर्त्यांच्या संयुक्त बैठका होऊन आंदोलनात्मक कार्यक्रम ठरेल. १९ नोव्हेंबरला महाराष्ट्र लोकशाही समितीच्या राज्यस्तरीय बैठकीतही दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा होऊन कृतीचे निर्णय होतील.

## केंद्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण कार्यक्रम

पुढील महत्त्वाच्या केंद्रीय कार्यक्रमांची अंमलबजावणी प्रत्येक जिल्ह्यात करावी असे राज्य कमिटीने ठरविले.

**(अ) ७ नोव्हेंबर २०१४ ते ७ नोव्हेंबर २०१५ - माकपच्या स्थापनेची ५० वर्षे**: या संबंधी राज्य कमिटीने पुढील निर्णय घेतले : (१) नोव्हेंबर २०१४ मध्ये प्रत्येक जिल्ह्यात यावर किमान एक तरी चांगला उत्साही जाहीर कार्यक्रम आयोजित करावा. त्यास उत्सवाचे स्वरूप देऊन पक्ष व जनसंघटनांच्या सदस्यांबरोबरच व्यापक पुरोगामी थरांनाही सामील करून घ्यावे. (२) 'जीवनमार्ग'मध्ये आलेले यासंबंधीचे तीन लेख आणि पुढील आव्हाने यांचा समावेश करून एक पुस्तिका राज्य कमिटीतर्फे प्रकाशित करून तिची मोठ्या प्रमाणावर विक्री करावी. (३) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची नवरत्ने, कॉ. ज्योती बसूंचे आत्मचरित्र, गदर चळवळीची १०० वर्षे, कॉ. प्रभाकर दोंदेंबाबत आठवणी, समाजसत्तावादी चीन - काल आज आणि उद्या, महाराष्ट्रातील आजचे वास्तव व उद्याची आव्हाने अशा प्रकारची पुस्तके तसेच पक्ष शिक्षण मालेतील उर्वरित पुस्तिका प्रकाशित कराव्यात. (४) १४ एप्रिल २०१५ रोजी 'जीवनमार्ग'लाही ५० वर्षे पूर्ण होत असल्याने, माकपची ५० वर्षे आणि 'जीवनमार्ग'ची ५० वर्षे या विषयाभोवती २०१५ची आकर्षक दिनदर्शिका डिसेंबर २०१४च्या मध्यापर्यंत प्रकाशित करून तिची विक्री राज्यभर मोठ्या प्रमाणात करावी. (५) 'जीवनमार्ग'चा सुवर्ण महोत्सवी विशेषांक २०१५च्या अखेरपर्यंत प्रकाशित करावा. (६) डॉक्युमेंटरी चित्रपट, पोस्टर प्रदर्शने, फेसबुकसारखी सोशल मीडियाची माध्यमे, वेबसाईट, युट्यूब, इंडियन स्कूल ऑफ सोशल सायन्सेस इत्यादी माध्यमांचाही हे वर्ष साजरे करताना उपयोग करावा. (७) सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे या वर्षभरात जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर प्रत्येक जिल्ह्यात पक्ष व जनसंघटनांतर्फे व्यापक जनआंदोलने संघटित करावीत, राजकीय-वैचारिक-संघटनात्मक शिबिरांवर भर द्यावा आणि कमजोर जिल्ह्यांनी किमान ५० नवीन गावांत वा मोहल्ल्यांत आधी जनसंघटना व नंतर पक्ष स्थापन करण्याच्या दिशेने जाणीवपूर्वक पावले टाकावीत.

**(ब) २६ नोव्हेंबर - मनरेगा कपातीविरुद्ध निषेध दिन:** भाजपचे मोदी सरकार महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने (मनरेगा)मध्ये कपात करून ती कालांतराने गुंडाळून टाकण्याच्या दिशेने पावले टाकत आहे. 'जीवनमार्ग'मध्ये या कारस्थानाचा तपशील दिलेला आहे. त्याविरुद्ध २६ नोव्हेंबर रोजी देशभर निदर्शने करण्याचे ठरले आहे. तशी ती राज्यभरही करावीत.

**(क) २७ नोव्हेंबर - सामाजिक जुलूम व जातीय भेदभावाविरुद्ध राष्ट्रीय परिषद, दिल्ली** : ही देशव्यापी परिषद दिल्लीत कॉन्स्टिट्युशन क्लब ॲनेक्स, मावळणकर हॉल शेजारी, विठ्ठलभाई पटेल हाऊसच्या जवळ, रफी मार्ग, नवी दिल्ली येथे २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता भरेल आणि ती सायंकाळी ७ वाजेपर्यंत चालेल. महाराष्ट्राला या परिषदेसाठी ५०चा कोटा दिला आहे, त्याचे वाटप पुढीलप्रमाणे करण्यात आले: मुंबई, सोलापूर, नांदेड, नाशिक, नंदुरबार-धुळे - प्रत्येकी ५, नागपूर - ३, बीड, परभणी, जालना, औरंगाबाद, हिंगोली, लातूर-उस्मानाबाद, पुणे, सांगली, सातारा, अहमदनगर, कोल्हापूर, जळगाव, ठाणे-पालघर, रायगड, वर्धा, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया - प्रत्येकी २. वरीलप्रमाणे सर्व जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनी या परिषदेसाठी हजर राहिलेच पाहिजे.

**(ड) ५ डिसेंबर - मोदी सरकारच्या धोरणांविरुद्ध कामगार-कर्मचाऱ्यांचा प्रतिकार दिन** : दिल्लीत सर्व कामगार संघटनांची परिषद होऊन मोदी सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी ५ डिसेंबर रोजी देशव्यापी प्रतिकार दिन पाळण्याचे ठरले आहे. त्याचे नेमके स्वरूप लवकरच होणाऱ्या सीटूच्या राज्य कमिटी बैठकीत ठरेल.

**(इ) ६ डिसेंबर - धर्मनिरपेक्षतेच्या रक्षणार्थ दिन** : ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येतील बाबरी मशीद उध्वस्त करणाऱ्या धर्मांध शक्ती आज स्पष्ट बहुमताने केंद्रात सत्तारूढ झाल्या आहेत आणि आता महाराष्ट्रातही त्या सत्तेवर आल्या आहेत. ६ डिसेंबर हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिनही आहे. तरी या दिवशी धर्मनिरपेक्षतेच्या रक्षणासाठी देशभर विविध कार्यक्रम घेण्याची हाक पक्षाच्या केंद्रीय कमिटीने दिली आहे. ती राज्यात सर्वत्र अंमलात आणावी असे ठरले.

**(फ) ८ ते १४ डिसेंबर - सहा डाव्या पक्षांतर्फे जनतेच्या नऊ ज्वलंत प्रश्नांवर देशव्यापी कृती सप्ताह** : याचा तपशील 'जीवनमार्ग'मध्ये इतरत्र देत आहोत. महाराष्ट्रात माकप, भाकप, शेकाप, दोन्ही लाल निशाण पक्ष, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष व इतर काही डाव्या पक्षांना सोबत घेऊन राज्यभर वरील प्रश्नांवर कृती करण्याची हाक राज्य कमिटीने दिली.

## महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचा आढावा व पुढील कार्ये

या विषयीचा राज्य सचिवमंडळाचा लेखी आढावा राज्य कमिटीसमोर मांडण्यात आला आणि त्यावर सविस्तर चर्चा होऊन त्यास मान्यता मिळाली. राज्य कमिटीच्या चर्चेच्या प्रकाशात अंतिम झालेला हा आढावा 'जीवनमार्ग'च्या ह्याच अंकात प्रकाशित केला जात आहे. त्यात शेवटी दिलेल्या पुढील कार्यांची महाराष्ट्रातील संपूर्ण पक्षाने नेटाने अंमलबजावणी करावी.

### पक्षाच्या अधिवेशनांविषयीचे निर्णय

**(अ) २१वी पक्ष काँग्रेस :-** २१ वी पक्ष काँग्रेस एप्रिल २०१५ मध्ये आंध्र प्रदेशात विशाखापट्टनम् येथे भरविण्याचे पक्षाच्या केंद्रीय कमिटीने ठरविले आहे. महाराष्ट्राला त्यासाठी १६ प्रतिनिधी मिळाले आहेत.

**(ब) २१वे राज्य अधिवेशन :-** पक्षाचे राज्य अधिवेशन दि. १३-१४-१५ मार्च २०१५ रोजी सुरगाणा, जि. नाशिक येथे भरविण्याचे राज्य कमिटीने ठरविले. अधिवेशनाची प्रतिनिधी फी प्रत्येकी रु. ६०० असेल.

२०१४ सालच्या पक्ष नूतनीकरणानंतर असलेली पक्ष सभासद व उमेदवारांची एकत्रित संख्या हा राज्य अधिवेशनासाठी प्रतिनिधित्वाचा आधार असेल आणि ४० सभासदांमागे १ प्रतिनिधी हे प्रतिनिधित्वाचे प्रमाण असेल. प्रतिनिधींची निवड करताना महिला व तरुण यांना योग्य स्थान दिले गेले पाहिजे असे राज्य कमिटीने ठरविले. कमी सभासदसंख्या असलेल्या ९ जिल्ह्यांना प्रत्येकी १ प्रेक्षक देण्याचे ठरले.

**(क) जिल्हा अधिवेशनांचा कार्यक्रम :-** सिंधुदुर्ग - २१ डिसेंबर, रायगड- २८ डिसेंबर, नागपूर - ३-४ जानेवारी, वर्धा ५ जानेवारी, चंद्रपूर - ६ जानेवारी, यवतमाळ - ७ जानेवारी, अमरावती - ८ जानेवारी, बुलडाणा - ९ जानेवारी, जळगाव - १० जानेवारी, नंदुरबार-धुळे - ११ जानेवारी, नांदेड - २४-२५ जानेवारी, परभणी - २६ जानेवारी, हिंगोली - २७ जानेवारी, बीड - २८ जानेवारी, भंडारा - २८ जानेवारी, गोंदिया - २९ जानेवारी, कोल्हापूर - ३१ जानेवारी-१ फेब्रुवारी, सांगली - २ फेब्रुवारी, सातारा - ३ फेब्रुवारी, पुणे - ४ फेब्रुवारी, सोलापूर - ६-७-८ फेब्रुवारी, लातूर - ९ फेब्रुवारी, उस्मानाबाद - १० फेब्रुवारी, जालना - ११ फेब्रुवारी, औरंगाबाद - १२ फेब्रुवारी, नाशिक - २१-२२ फेब्रुवारी, अहमदनगर - २३ फेब्रुवारी, ठाणे-पालघर - २४-२५ फेब्रुवारी, मुंबई - २७-२८ फेब्रुवारी-१ मार्च, वाहतूक - नंतर ठरेल.

जिल्हा अधिवेशनापूर्वी सर्व तालुका, शहर व विभाग अधिवेशने पूर्ण केलीच पाहिजेत असे राज्य कमिटीने ठरविले.

**(ड) जिल्हा कमिट्यांची संख्या :-** नव्याने निवडावयाच्या पक्षाच्या जिल्हा कमिट्या/जिल्हा संघटक कमिट्यांच्या संख्येबाबत राज्य कमिटीने पुढील सूत्र ठरविले. १०० पेक्षा कमी सभासद असलेल्या जिल्ह्यांच्या जिल्हा संघटक कमिट्यांची कमाल संख्या ११ असेल. १००हून अधिक सभासदसंख्या असलेले जिल्हे ११ अधिक दर २५ सभासदांमागे १ या संख्येची जिल्हा कमिटी/जिल्हा संघटक कमिटी निवडू शकतील. पण कोणत्याही परिस्थितीत जिल्हा कमिटीची संख्या ४१ हून अधिक असता कामा नये.

तालुका/ शहर कमिट्यांची संख्या किती असावी याचे सूत्र प्रत्येक जिल्हा कमिटीने ठरवावे असे राज्य कमिटीने ठरविले.

**(इ) शाखा अधिवेशने :-** पक्षाच्या प्रत्येक शाखेचे रीतसर अधिवेशन झालेच पाहिजे व त्यात सक्षम शाखा सचिवाची निवड झाली पाहिजे. शाखा कार्यपद्धतीमध्ये सर्वच जिल्ह्यांत प्रचंड कमजोऱ्या आहेत. दर महिन्याला पक्ष शाखेची बैठक घेऊन शाखेने आपल्या अनेकविध जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. पक्ष सुधारणेची मोहीम पक्ष शाखेपर्यंत घेऊन जाऊन शाखा कार्यपद्धतीत या अधिवेशनांपासून आमूलाग्र सुधारणा करण्याचे ठरले.

**(फ) सचिवांसाठी तीन टर्म्सची मर्यादा:-** गेल्या पक्ष काँग्रेसने केलेल्या घटना दुरुस्तीनुसार विभाग कमिटी ते केंद्रीय कमिटीपर्यंतच्या सर्व सचिवांना तीन टर्म्सची मर्यादा घालून देण्यात आली आहे. सर्व अधिवेशनांपूर्वी नीट सामूहिक तयारी करून तिची अंमलबजावणी करावी ही विशेष सूचना.

**(ग) सर्व अधिवेशनांसाठी वरिष्ठ कमिटीच्या किमान दोन सदस्यांची उपस्थिती:-** सर्व स्तरांवरील पक्ष अधिवेशनांसाठी वरिष्ठ कमिटीचे किमान दोन सदस्य हजर असलेच पाहिजेत. सर्व तालुका अधिवेशनांसाठी जिल्हा सचिव व त्या तालुक्याची जबाबदारी असलेले जिल्हा सचिवमंडळ सदस्य हजर असले पाहिजेत. जवळजवळ सर्व जिल्हा अधिवेशनांसाठी राज्य सचिव व त्या जिल्ह्याची जबाबदारी असलेले राज्य सचिवमंडळ सदस्य हजर असले पाहिजेत.

**(इ) पक्ष मुखपत्रांची वर्गणीदार नोंदणी मोहीम:-** शाखा ते राज्य या सर्व आगामी अधिवेशनांत 'जीवनमार्ग' व इतर पक्ष मुखपत्रांच्या वर्गणीदारांत वाढ करण्याची एक विशेष मोहीम राबविण्याचे राज्य कमिटीने ठरविले. प्रत्येक पातळीवरील अधिवेशनाची लेखी नोटिस काढताना त्यात 'जीवनमार्ग'ची आजीव (रु. ३०००) अथवा वार्षिक (रु. ३००) वर्गणी व इतर पक्ष मुखपत्रांची 'लोकलहर' (रु. २००), 'पीपल्स डेमॉक्रसी' (रु. २५०), 'मार्क्सिस्ट' (रु. १००) - अशी वर्गणी सोबत घेऊन येण्याच्या सूचनेचा स्पष्ट समावेश

सर्व पक्ष सेक्रेटरींनी केलाच पाहिजे, असे ठरले. 'जीवनमार्ग'ची प्रत्येक जिल्ह्याची मेलिंग लिस्ट (वर्गणीदारांचे पत्ते आणि वर्गणी संपल्याची तारीख) सर्व जिल्हा सचिवांना पुन्हा देण्यात आली. त्यात २३०० जणांची वर्गणी संपली आहे. त्यांचे नूतनीकरण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न या सर्व अधिवेशनांत केलाच पाहिजे. जिल्हा अधिवेशनांत पक्ष साहित्याच्या विक्रीचा स्टॉल अवश्य आयोजित करावा आणि कॉम्रेड्सना साहित्य खरेदीसाठी पुरेशी रक्कम सोबत आणण्याच्या सूचना अगोदरच देण्यात याव्यात, असेही ठरले.

**(ज) संघटनात्मक फॉर्म भरून देणे :-** या सर्व अधिवेशनांत प्रत्येक स्तरावरील अधिवेशनाची माहिती भरून देण्यासाठी एक फॉर्म (जो जिल्हा कमिटीला भरून द्यावयाचा आहे) आणि सर्व अधिवेशने पूर्ण झाल्यावर जिल्हा कमिटीने राज्य कमिटीला भरून द्यावयाचे दोन फॉर्म हे सादर केले पाहिजेत. या माहितीतून काढल्या जाणाऱ्या संघटनात्मक निष्कर्षांचा समावेश जिल्हा व राज्य अधिवेशनाच्या अहवालात झाला पाहिजे.

**(ल) सर्व प्रकारची थकबाकी जिल्हा अधिवेशनात न चुकता भरणे :-** जिल्हा कमिट्यांकडे असलेली सर्व प्रकारची थकबाकी त्यांच्या जिल्हा अधिवेशनात कोणत्याही परिस्थितीत भरली गेलीच पाहिजे असा स्पष्ट निर्णय राज्य कमिटीने घेतला. ती जिल्हा अधिवेशनात न भरल्यास त्या जिल्ह्याला राज्य अधिवेशनासाठी प्रतिनिधित्व दिले जाणार नाही असे ठरले.

**(म) पक्षाचे हिशोब :-** पक्षाच्या जिल्हा/तालुका/शहर कमिट्यांचे गेल्या तीन वर्षांचे हिशोब तयार करून पक्षाच्या आगामी अधिवेशनांपूर्वी ते जिल्हा/तालुका/शहर कमिटीत मंजुरीसाठी ठेवलेच पाहिजेत हा निर्णय राज्य कमिटीने घेतला. राज्य कमिटीचे गेल्या तीन वर्षांचे ऑडिट केलेले हिशोब राज्य अधिवेशनापूर्वी राज्य कमिटीसमोर नेहमीप्रमाणे मांडले जातील.

## जनआघाड्यांच्या अहवालांवर राज्य व जिल्हा कमिट्यांत चर्चा

सहा मुख्य जनआघाड्यांच्या राज्य निमंत्रकांनी आपल्या सबकमिट्या वा फ्रॅक्शन कमिट्यांच्या बैठका तातडीने घेऊन आपापले अहवाल तयार करण्यास सुरुवात करावी आणि हे सर्व अहवाल डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत तयार करून राज्य सचिवमंडळास सादर करावेत. १३-१४-१५ फेब्रुवारी रोजी बेलापूर येथे होणाऱ्या राज्य कमिटी बैठकीत या सहाही अहवालांवर चर्चा होऊन ते अंतिम केले जातील आणि ते राज्य अधिवेशनाच्या प्रतिनिधींना दिले जातील.

प्रत्येक जिल्हा अधिवेशनापूर्वी हीच पद्धत अंमलात आणून प्रत्येक जनआघाडीच्या संक्षिप्त अहवालावर जिल्हा कमिटीत चर्चा घडवून आणून जिल्ह्याच्या अहवालात त्यांचा समावेश करावा.

जनआघाड्यांच्या अहवालांत पुढील पाच विभाग असावेत:- १) ती जनआघाडी ज्या वर्गात वा समुदायात काम करते त्या वर्ग/समुदाया समोरील राज्यातील/जिल्ह्यातील ज्वलंत प्रश्न व समस्या, २) मार्च २०१२च्या अकोले राज्य अधिवेशनानंतरच्या तीन वर्षांत त्या जनआघाडीतर्फे झालेल्या आंदोलनांचा व इतर कार्यक्रमांचा संक्षिप्त गोषवारा, ३) त्या जनआघाडीची आजची संघटनात्मक परिस्थिती (त्यात २०११ ते २०१४ या वर्षांच्या जिल्हानिहाय सभासदसंख्येचा तक्ता अवश्य जोडावा), ४) त्या जनआघाडीवर केलेल्या पक्षबांधणीचा आढावा, ५) पुढील कार्ये.

## २०१४च्या पक्ष नूतनीकरणाचे उर्वरित साहित्य/नूतनीकरण अहवाल/पक्ष लेव्ही

२०१४च्या पक्ष नूतनीकरणाचे अनेक जिल्ह्यांचे पक्ष नूतनीकरण अहवाल पॉलिटब्यूरोने दिलेल्या नमुन्यात आलेले नाहीत. हे सर्व अहवाल नोव्हेंबर अखेरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत राज्य केंद्राकडे आलेच पाहिजेत. राज्याचा संघटनात्मक अहवाल लिहिण्यासाठी त्यांची निकड आहे.

काही जिल्ह्यांची यंदाची पक्ष लेव्ही अपूर्ण आहे. तसेच काही माजी आमदार/माजी खासदारांची २०१४ सालची काहीच पक्ष लेव्ही आलेली नाही. ही सर्व लेव्ही नोव्हेंबर अखेरपर्यंत संबंधितांनी अवश्य चुकती करावी.

२०१५च्या पक्ष सभासद नूतनीकरणाची सुरुवात १ जानेवारी २०१५ पासून रीतसर करण्याचे आवाहन राज्य कमिटीने केले.

## राज्य कमिटीच्या पुढील बैठका

राज्य कमिटीची पुढील बैठक शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११ वाजता कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक भवन, बेलापूर येथे भरेल व ती रविवार, दि. १५ फेब्रुवारीला सायंकाळी संपेल. या बैठकीत सर्व सहा प्रमुख जनआघाड्यांच्या अहवालांवर चर्चा होऊन ते अंतिम केले जातील. त्याचबरोबर २१व्या पक्ष काँग्रेससमोर मांडण्यात येणाऱ्या राजकीय ठरावाच्या मसुद्यावर तसेच आढावा अहवालावर या बैठकीत चर्चा केली जाईल.

त्यापुढील राज्य सचिवमंडळाची बैठक सोमवार, दि. २ मार्च २०१५ रोजी दुपारी १२ वाजता जनशक्ती येथे, आणि राज्य कमिटीची बैठक मंगळवार, दि. ३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता बेलापूरला भरेल व ती बुधवार, दि. ४ मार्च रोजी सायंकाळी संपेल. या बैठकीत राज्य अधिवेशनासमोर मांडावयाच्या राजकीय-संघटनात्मक अहवालावर चर्चा होऊन तो अंतिम केला जाईल. तसेच पक्षाच्या राज्य कमिटीचे हिशोबही मान्यतेसाठी मांडण्यात येतील.

□□□

# २०१४च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा आढावा

*(४-५ नोव्हेंबर २०१४ रोजी बेलापूर येथे भरलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कमिटीने मंजूर केलेला)*

## एकूण चित्र

सहा महिन्यांपूर्वीच्या लोकसभा निवडणुकीत भाजपला संपूर्ण बहुमत मिळून देशाचे राजकारण उजवीकडे सरकल्याचा निष्कर्ष पक्षाच्या केंद्रीय कमिटीने काढला होता. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर संपूर्ण बहुमतात जरी नसले, तरी भाजपचे सरकार प्रथमच राज्यात सत्तारूढ झाले असून येथील राजकारणसुद्धा उजवीकडे सरकले आहे.

अनेक वर्षांनंतर शिवसेना-भाजप युती आणि काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी या दोहोंमध्ये फूट पडल्यामुळे ही निवडणूक बहुकोनी आणि चुरशीची झाली. निकालानंतर समोर आलेले एकूण चित्र आधी पाहू.

या विधानसभा निवडणुकीत भाजपची सरशी झाली आहे. २७.८ टक्के मते मिळवून त्याने ४२.४ टक्के जागा (१२२) जिंकल्या आहेत. २००९च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत, भाजपला तेव्हा मिळालेली १४ टक्के मते आता दुपटीने वाढली आहेत, आणि तेव्हा मिळालेल्या ४६ जागा अडीच पटीहून जास्त वाढल्या आहेत.

काँग्रेस वगळता महाराष्ट्र विधानसभेत १००हून अधिक जागा जिंकणारा भाजप हा पहिला पक्ष ठरला आहे. १९७८ साली आणीबाणीविरोधी वातावरणात झालेल्या विधानसभा निवडणुकीतही जनता पक्षाला ९९ जागांवरच समाधान मानावे लागले होते.

तरीसुद्धा हरियाणात त्याच दिवशी झालेल्या निवडणुकीत भाजपने ९० पैकी ४७ जागा जिंकून जसे स्पष्ट बहुमत मिळविले, तसे बहुमत मिळविण्याचे भाजपचे स्वप्न पूर्ण झाले नाही. त्या बहुमतासाठी भाजपला २३ जागा कमी पडल्या.

६३ जागा आणि १९.३ टक्के मते मिळवून शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर आली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या ४४ जागा आणि १६.३ टक्के मतदानाच्या तुलनेत यंदा वाढ झाली असली तरी सर्वात मोठा पक्ष बनून मुख्यमंत्रीपद मिळविण्याचे शिवसेनेचे स्वप्न भंग पावले आहे. भाजपच्या तुलनेत जेमतेम निम्मेच आमदार सेनेचे निवडून आले आहेत.

गेली १५ वर्षे महाराष्ट्रावर सत्ता गाजविणाऱ्या काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीला या निवडणुकीत हादरा बसणार हे सुरुवातीपासूनच स्पष्ट होते. आणि नेमके तेच झाले. दोन्ही पक्षांना जबर फटका बसला.

काँग्रेसचे सर्वाधिक नुकसान झाले. गेल्या वेळच्या ८२ जागा आणि २१ टक्के मतांवरून घसरून यंदा काँग्रेसला फक्त ४२ जागा आणि १८ टक्के मते मिळाली; तर गेल्या वेळच्या ६२ जागा आणि १६.४ टक्के मतांवरून राष्ट्रवादी काँग्रेस ४१ जागा आणि १७.२ टक्के मतांपर्यंत गेली. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेली चुरशीची लढत काँग्रेसने जागा आणि मते या दोन्ही निकषांवर थोडक्यात जिंकली, एवढेच काय ते समाधान त्या पक्षाला झाले असावे.

सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीशी तुलना करताना, वरील चारही प्रस्थापित पक्षांच्या मतांच्या टक्केवारीत फारसा बदल झाला नसला, तरी जागांच्या बाबतीत नक्कीच मोठा बदल झालेला आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीने ४८ पैकी ४२ जागा जिंकून २८८ पैकी २४४ विधानसभा क्षेत्रात आघाडी घेतली होती. त्याऐवजी आता भाजप व सेना वेगवेगळे लढून त्यांनी १८६ जागा जिंकल्या आहेत. म्हणजेच ५८ जागांची घट झाली आहे – भाजप १३२ वरून १२२ आणि शिवसेना १०० वरून ६३, आणि महायुतीतील इतर लहान पक्ष १२ वरून १.

दुसऱ्या बाजूला काँग्रेस आणि राष्ट्रवादीची जागांबाबतची स्थिती गेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत थोडी सुधारली आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला फक्त १४ विधानसभा क्षेत्रांत आघाडी होती, आता त्याने ४२ जागा जिंकल्या आहेत. तसेच राष्ट्रवादीला लोकसभेत २६ विधानसभा क्षेत्रांत आघाडी होती, आता त्याने ४१ जागा जिंकल्या आहेत.

इतर सर्व पक्षांना मिळून लोकसभेत फक्त ४ विधानसभा क्षेत्रांत आघाडी होती, आता त्या सर्वांनी मिळून १९ जागा जिंकल्या आहेत :-

महाराष्ट्रातील डाव्या व लोकशाही पक्षांनी निवडणुकीच्या तोंडावर बनविलेल्या महाराष्ट्र लोकशाही समितीने ५ जागा जिंकल्या आहेत - शेकापने ३, माकपने १ आणि भारिप बहुजन महासंघाने १. शेकापने १ टक्का आणि भारिपने०.९ टक्का अशी मते टिकविली आहेत. माकपची मते ०.६ टक्क्यावरून ०.४ टक्क्यांवर आली आहेत. भाकप व जद (से)चे गेल्या अनेक विधानसभांत प्रतिनिधित्व नाही. त्यांना यंदा मिळालेली मते प्रत्येकी ०.१ टक्क्यापेक्षा कमी आहेत. महाराष्ट्रातील डाव्या व लोकशाही पक्षांचे चित्र गेली अनेक वर्षे असमाधानकारक आहे.

मनसेच्या जागा या निवडणुकीत १३ वरून १ वर आल्या आहेत. गेल्या खेपेची त्याची प्रभावक्षेत्रे असलेल्या मुंबई, ठाणे व नाशिक जिल्ह्यातून एकही जागा आली नाही. जी आली ती पुणे जिल्ह्यातून जुन्नरची व तेथेही

| पक्ष | २००९ लोकसभा | | २०१४ लोकसभा | | २००९ विधानसभा | | २०१४ विधानसभा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जागा | मते टक्के | जागा | मते टक्के | जागा | मते टक्के | जागा | मते टक्के |
| भाजप | ९ | १८.२ | २३ | २७.३ | ४६ | १४.० | १२२ | २७.८ |
| शिवसेना | ११ | १७.० | १८ | २०.६ | ४४ | १६.३ | ६३ | १९.३ |
| काँग्रेस | १७ | १९.६ | २ | १८.१ | ८२ | २१.० | ४२ | १८.० |
| राष्ट्रवादी | ८ | १९.३ | ४ | १६.० | ६२ | १६.४ | ४१ | १७.२ |

मनसेचा उमेदवार सेनेतून नुकताच आयात केलेला होता. मनसेची मते ५.७ टक्क्यांवरून ३.१ टक्क्यांवर घसरली आहेत. मनसेची घसरण ही स्वागतार्ह बाब आहे.

पण दुसरीकडे या निवडणुकीत प्रथमच एमआयएम या मुस्लीम मूलतत्ववादी पक्षाने मुंबई आणि औरंगाबादेत प्रत्येकी एक जागा जिंकून आणि सोलापूर मध्य तसेच इतर दोन जागांवर दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवून जो प्रवेश केला आहे तो चिंताजनक आहे. त्याने ०.९ टक्के मते घेतली आहेत.

बहुजन विकास आघाडीच्या जागा २ वरून ३ वर (०.६ टक्के मते) आणि समाजवादी पार्टीच्या जागा ४ वरून १ वर (०.२ टक्के मते) आल्या आहेत. बसपाने २.३ टक्के मते कायम ठेवली, पण गेल्या वेळेप्रमाणे यंदाही जागा जिंकली नाही. सात अपक्ष निवडून आले आहेत.

या निवडणुकीत समोर आलेले विभागीय चित्र पाहू.

| विभाग | भाजप | शिवसेना | कॉंग्रेस | राष्ट्रवादी | इतर |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई-ठाणे | २४ | २१ | ५ | ४ | ६ |
| कोकण | १ | ७ | १ | ४ | २ |
| प. महाराष्ट्र | २४ | १३ | १० | १९ | २ |
| उ. महाराष्ट्र | १४ | ७ | ७ | ५ | २ |
| विदर्भ | ४४ | ४ | १० | १ | ४ |
| मराठवाडा | १५ | ११ | ९ | ८ | ३ |
| | १२२ | ६३ | ४२ | ४१ | १९ |

विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मुंबई-ठाणे, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा या ६ पैकी ५ विभागांत भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत आणि फक्त कोकणात शिवसेनेला थोडी आघाडी आहे हे वरून दिसेल.

## संक्षिप्त विश्लेषण

कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारची गेल्या १५ वर्षांची जनविरोधी धोरणे, अकार्यक्षम कारभार आणि गगनचुंबी भ्रष्टाचार यामुळे जनता प्रचंड त्रस्त झाली होती आणि सत्तापरिवर्तनाची तिची मागणी होती. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांमध्ये विस्तव जात नव्हता, पावलोपावली त्यांच्या नेत्यांचे खटके उडत होते आणि दोन्ही पक्षांमध्ये अंतर्गत साठमारी भरपूर होती. जनता या सततच्या सुंदोपसुंदीला कंटाळली होती.

आदर्श सोसायटी, राष्ट्रकूल क्रिडा स्पर्धा सिंचन, सहकारी बँक, दिल्लीतील महाराष्ट्र सदन या सर्वात झालेल्या प्रचंड भ्रष्टाचार प्रकरणांबद्दलही कॉंग्रेस-राष्ट्रवादी सरकारला लोकांनी तडाखा दिला. कॉंग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या स्वच्छ प्रतिमेचे भांडवल करण्याचा प्रयत्न केला खरा, पण कोणतेही निर्णय न घेणारा वा आपली कर्तृत्वशील छाप न पाडणारा अकार्यक्षम मुख्यमंत्री अशीच त्यांची प्रतिमा राज्यभर पसरली. अशी प्रतिमा तयार करण्यात मुख्यमंत्र्यांच्या स्वत:च्या कारभाराबरोबरच राष्ट्रवादी कॉंग्रेसचा सर्वाधिक हात होता.

भाजपच्या या निवडणुकीतील यशामागे कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारबद्दल जनतेचा भ्रमनिरास हे सर्वात महत्वाचे कारण होते यात शंका नाही.

पण त्याचबरोबर इतरही काही महत्वाची कारणे होती. लोकसभा निवडणुकीत झालेला भाजपचा मोठा विजय आणि नरेंद्र मोदींचा पंतप्रधान म्हणून सहा महिन्यांतील कारभार हे महाराष्ट्र आणि हरियाणात भाजपला मिळालेल्या विजयाचे आणखी एक महत्त्वाचे कारण होते. लोकसभा निवडणुकीपेक्षा मोदी प्रभाव थोडा कमी झाला असला (मोदींनी महाराष्ट्रात ज्या २७ जागांवर जाहीर सभा घेतल्या, त्यांपैकी १७ जागांवर भाजपचा पराभव झाला) तरी तो प्रभाव अजून पूर्णत: ओसरलेला नाही हे प्रकर्षाने जाणवले.

बड्या भांडवलदारवर्गाचा जवळपास एकमुखी पाठिंबा असल्याने भाजपने या निवडणुकीत केलेला द्रव्यबळाचा वापर गेल्या लोकसभा निवडणुकीइतकाच अभूतपूर्व होता. मीडियावर दिलेल्या जाहिरातींमध्ये भाजपने इतका पैसा खर्च केला, की इतर सर्व भांडवली पक्षांनी केलेल्या एकूण खर्चापेक्षा तो जास्त असावा.

भाजपला या निवडणुकीतील पाठिंबा अनेक घटकांकडून मिळाला, पण शहरी व निमशहरी भाग, मध्यमवर्ग, उच्च जाती, ओबीसी आणि विशेषत: तरुण या घटकांतून त्यास सर्वाधिक समर्थन मिळाले. मराठा, दलित व आदिवासी समाजातूनही त्यास बऱ्यापैकी पाठिंबा मिळाला. कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने अखेरच्या क्षणी घेतलेल्या मराठा आरक्षण आणि मुस्लिम आरक्षणाच्या अपेक्षित फायदा त्यांना मिळाल्याचे दिसत नाही. धनगर समाजाला आदिवासींमध्ये समाविष्ट करा हा प्रश्न या निवडणुकीपूर्वी गाजला, त्याचा काहीसा निर्णयाचा फायदा भाजपला झाला असावा. त्याबरोबर दलित व विशेषत: आदिवासींमध्ये रा.स्व.संघ व भाजप शिरकाव करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न बराच काळ करत आहेत, त्याचाही फायदा त्यांना मिळाला

खरेतर लोकसभा निवडणुकीतील यशानंतर महाराष्ट्रात स्वबळावर विधानसभा लढविण्याचा निर्णय भाजपने घेतला. शिवसेनेसोबत जागावाटपाची बोलणी म्हणजे निव्वळ फार्स होता. आपले स्वतंत्र बस्तान महाराष्ट्रात आणि हरियाणातही बसविण्याची इतकी चांगली संधी पुढे येणार नाही याची भाजपला खात्री होती. शिवसेनेने भरपूर आदळ आपट केली, मोदी-शहा प्रणित भाजपला अफझल खानाची फौज म्हणून हिणवले, मराठी विरुद्ध गुजराती ताणतणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी भाजपला सेनेपेक्षा जवळजवळ दुप्पट जास्त आमदार जिंकून आणण्यात यश आले.

या खेळीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसने भाजपला पुरेपूर साथ दिली. २५ सप्टेंबरला युती तुटल्याचे भाजपने जाहीर केल्याच्या तासाभरातच आघाडी तुटल्याचेही राष्ट्रवादीने जाहीर केले. इतकेच नव्हे, तर निवडणूक निकाल पूर्णत: जाहीर होत नाहीत तोच राष्ट्रवादीने भाजपच्या संभाव्य सरकारला बिनशर्त पाठिंबा देण्याचे जाहीर करून शिवसेनेची पुरती कोंडी करून ठेवली.

या खेळीमागे राष्ट्रवादीने जाहीर केल्याप्रमाणे 'महाराष्ट्राचे हित' वगैरे काहीही नसून, भ्रष्टाचाराचे आरोप असलेले प्रफुल पटेल, अजित पवार, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांना वाचविण्यासाठी केंद्रात व राज्यात सत्ताधारी झालेल्या भाजपसमोर नांगी टाकण्याचाच हा लाचार प्रकार आहे.

एमआयएम सारख्या मूलतत्ववादी पक्षाचा या निवडणुकीत पडलेला प्रभाव ही चिंताजनक बाब आहे असे आपण वर म्हटले आहे. भाजपची देशात झालेली सरशी, त्यामुळे अल्पसंख्याकांमध्ये निर्माण झालेली भीती, कॉंग्रेस, राष्ट्रवादी व समाजवादी पक्षांचा अल्पसंख्यांकांविषयीचा दांभिकपणा या सर्व कारणांतून एमआयएम सारख्या पक्षाची वाढ झाली आहे.

मनसेने गेल्या निवडणुकीत काही प्रगती केली होती, पण गेल्या लोकसभेत व आताच्या विधानसभेत मनसेला मोठा फटका बसला याचे आपण वर स्वागत केले आहे. मनसेला काँग्रेस-राष्ट्रवादीने २००९ मध्ये पूर्ण समर्थन दिले होते. कारण सेना-भाजपचा प्रभाव कमी करण्यासाठी मनसेचा उपयोग केला गेला. मनसेने नंतर अनेक संधिसाधू भूमिका घेतल्या. गेल्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधानपदासाठी नरेंद्र मोदींना उघड पाठिंबा दिला. तथाकथित टोलविरोधी आंदोलन मनसेने मध्येच सोडून दिले. या सर्वाचा परिणाम व्हायचा तोच झाला.

या निवडणुकीत पैसा, जात आणि धर्म यांचा प्रभाव प्रचंड वाढल्याचे स्पष्टपणे दिसून आले. चारही प्रमुख भांडवली पक्षांनी पाण्यासारखा पैसा ओतला. निवडणूक आयोगाने छापे टाकून काही लाख वा कोटी रुपये जप्त केले, पण ते केवळ हिमनगाचे टोक होते. जात व धर्माचा तर सर्वच भांडवली पक्षांनी सर्रास वापर केला. आमूलाग्र निवडणूक सुधारणा केल्याशिवाय यास आळा घालणे शक्य नाही.

## महाराष्ट्र लोकशाही समितीची व पक्षाची कामगिरी

या निवडणुकीसाठी डाव्या, लोकशाही व धर्मनिरपेक्ष शक्तींना एकत्रित करण्याचा प्रयत्न झाला. शेकापने लोकसभा निवडणुकीच्या वेळेस मनसे सोबत समझोता करण्याचे धोरण सोडून दिले. शेकाप, माकप, भाकप व जद(से) यांची डावी लोकशाही समिती, भारिप-बहुजन महासंघ, दोन्ही लाल निशाण पक्ष व इतरांची महाराष्ट्र लोकशाही आघाडी आणि रिपब्लिकन सेना, शिवराज्य पक्ष इ.चा परिवर्तन मोर्चा यांची मिळून महाराष्ट्र लोकशाही समिती स्थापन झाली. जागावाटप काही प्रमाणात झाले पण ते सदोष होते. समिती ऐन निवडणुकीच्या तोंडावर तयार केल्याने, ती कोणत्याही संयुक्त संघर्षातून तयार न झाल्यामुळे तिला विश्वासार्हता नव्हती. गेल्या वेळेस रिडालोसचे जे सुरुवातीला बऱ्यापैकी वातावरण तयार झाले ते सुद्धा या वेळेस झाले नाही.

भाकपने आपल्याविरुद्ध शहापूर (अज), जि. ठाणे आणि परतूर, जि. जालना या दोन जागा लढवल्या. दोन्ही ठिकाणी आपल्याला त्यांच्यापेक्षा जास्त मते मिळाली. शहादा (अज), जि. नंदुरबार येथील जागाही आपल्याविरुद्ध लढविण्याचा त्यांचा तीव्र आग्रह होता, पण त्यांनी ती शेवटी सोडली आणि काँग्रेस/राष्ट्रवादीला मदत केली. शेकाप, जद(से) व इतर पक्षांसोबतही भाकपच्या या निवडणुकीत 'मैत्रीपूर्ण' लढती झाल्या.

वर म्हटल्याप्रमाणे शेकाप-३, माकप-१ आणि भारिप-बमसंघ-१ अशा ५ जागा या समितीने जिंकल्या.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने ह्या निवडणुकीत नाशिक जिल्ह्यातील कळवण (अज) जागा जिंकली ही आनंदाची घटना होती. पक्षाचे राज्य सचिवमंडळ सदस्य जे. पी. गावीत हे येथून विजयी झाले. यापूर्वी सुरगाणा (अज) जागेवरून ते सहा वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. २००९ साली मतदारसंघांची पुनर्रचना झाली तेव्हा आपण कळवणची जागा हरली होती. या खेपेस माकप - ६७,७९५, राष्ट्रवादी - ६३,००९, भाजप - २५,४५७, शिवसेना - ९,०२४, काँग्रेस - ५,६९९, बसपा - १,३९५, अपक्ष - ८८७, नोटा - १,६२३ असे या जागेवरील मतदान होते. महाराष्ट्रात या जागेवर झालेल्या पक्षाच्या महत्वपूर्ण विजयासाठी सुरगाणा व कळवण तालुक्यातील असंख्य कार्यकर्त्यांनी जिवाचे रान केले, त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले पाहिजे.

पालघर (पूर्वीचा ठाणे) जिल्ह्यातील डहाणू (अज) जागा या खेपेस जिंकण्याची आपली अपेक्षा होती. १९७८ नंतर सलग आठ निवडणुकीत आधी जव्हार व २००९ साली पुनर्रचनेनंतर डहाणूची जागा पक्षाने सातत्याने जिंकली होती. पण या वेळेस पक्षाचे जिल्हा सचिव व विद्यमान आमदार राजाराम ओझरे यांनी पक्षाचा घोर विश्वासघात केला. पक्ष सभासदही नसलेला त्यांचा मुलगा पक्षाच्या उमेदवाराविरुद्ध अपक्ष म्हणून उभा राहिला आणि पक्षाच्या पराभवाचे ते सर्वात मोठे कारण ठरले. यामागे रास्वसंघ-भाजपचे 'अर्थपूर्ण' कारस्थान असल्याचे नंतर उघडकीस आले. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसची व शिवसेनेची अनेक मते भाजपकडे सरकणे हेही आणखी एक महत्वाचे कारण होते. महाराष्ट्रातील पक्षाच्या इतर सर्व उमेदवारांप्रमाणेच डहाणूतील पक्षाचे उमेदवार व राज्य कमिटी सदस्य बारक्या मांगात यांची उमेदवारी जिल्हा व राज्य कमिटीने एकमताने निश्चित केली होती. आपणास येथे २८,१४९ मते मिळाली व आपण दुसऱ्या क्रमांकावर आलो. भाजपचा १६,७०० मताधिक्याने विजय झाला. अपक्ष बंडखोराला १२,९६८ मते मिळाली. पक्ष एकसंघ राहिला असता तर डहाणूची जागा नक्कीच पुन्हा जिंकता आली असती. या पक्षांतर्गत बंडखोरीचा आणि विश्वासघाताचा खोलात जाऊन विचार करण्याची निकड आहे.

सोलापूर मध्यची तिसरी जागा जिंकण्याची आपली अपेक्षा होती. पक्षाचे केंद्रीय कमिटी सदस्य व माजी आमदार नरसय्या आडम हे येथे पक्षाचे उमेदवार होते. पण या जागेवर अत्यंत धक्कादायक निकाल लागला. एकीकडे एमआयएम हा मुस्लिम मूलतत्ववादी पक्ष तर दुसरीकडे शिवसेना व भाजप यांमध्ये झालेले धर्मांध ध्रुवीकरण, काँग्रेसचा द्रव्यबळाचा प्रचंड मारा आणि या सर्वांनी आपल्या पक्षाच्या उमेदवाराला लक्ष्य करून केलेला धादांत खोटा व खोडसाळ प्रचार या सर्व कारणांमुळे आपल्या पक्षाला १३,९०४ मते मिळून आपण पाचव्या क्रमांकावर फेकलो गेलो. आपण या मतदारसंघात अनेक लढे सातत्याने केले, लोकांचे प्रश्न सोडविण्यास योगदान केले. पण जनतेचे राजकीयीकरण करू शकलो नाही आणि आवश्यक तशी मजबूत पक्ष संघटना बांधू शकलो नाही, ही आपल्या पराभवाची मूळ कारणे होती.

कळवण, डहाणू व सोलापूर मध्य या ३ जागांव्यतिरिक्त इतर ४ जागांवर म्हणजे एकूण ७ जागांवर आपण १० हजारांहून अधिक मते घेऊ शकलो. त्यात नाशिक पश्चिम (उमेदवार डॉ. डी. एल. कराड) - १६,८७० मते, दिंडोरी (अज) (ॲड. दत्तू पाडवी) - १३,९२४ मते, विक्रमगड (अज) (रतन बुधर) - १३,१५२ मते आणि अकोले (अज) (नामदेव भांगरे)- ११,८६१ मते, या मतदारसंघांचा समावेश होता.

इतर मतदारसंघांपैकी ३००० ते ६००० मते पाथरी - ५,५१७, पालघर (अज) - ४,९७३, हातकणंगले (अजा) - ४,२२८, किनवट - ४,१५८, बोईसर (अज) - ३,६३९, शहापूर (अज) - ३,५५३ आणि परळी - ३,०५३ या ७ मतदारसंघांत मिळाली.

१५०० ते ३००० मते मिळणारे ६ मतदारसंघ पुढीलप्रमाणे होते- शहादा (अज) - २,८९३, भांडुप पश्चिम - २,८७५, अंधेरी पश्चिम - २,१३८, परतूर - २,१०६, इचलकरंजी - १,५७४, बल्लारपूर - १,५७१.

२००९ सालच्या विधानसभा निवडणुकीशी तुलना करता कळवण (अज), दिंडोरी (अज), अकोले (अज) आणि पालघर (अज) या चारच मतदारसंघांत आपली मते वाढली.

डहाणू (अज), सोलापूर मध्य, नाशिक पश्चिम, विक्रमगड (अज), किनवट, शहादा (अज), शहापूर (अज), इचलकरंजी, अंधेरी पश्चिम आणि भांडुप पश्चिम (२००४) या मतदारसंघांत २००९च्या तुलनेत आपली मते घटली.

पाथरी, हातकणंगले (अजा), बोईसर (अज), परळी, परतूर आणि बल्लारपूर हे पुनर्रचित मतदारसंघ आपण प्रथमच लढविले.

गेल्या ४ विधानसभा निवडणुकीत पक्षाला मिळालेली एकूण मते पुढीलप्रमाणे आहेत-: १९९९ - २,१०,०३० (२३ जागा), २००४ - २,५९,६६७ (१६ जागा), २००९ - २,७०,०५२ (२० जागा), २०१४ - २,०७,९३३ (२० जागा). आदिवासी राखीव जागांवर त्यातल्या त्यात पक्षाने बरी कामगिरी केली आहे याची नोंद घेतली पाहिजे.

निवडणूक निकालानंतर राज्य कमिटीची बैठक लवकरच झाल्यामुळे या निवडणुकीचा आणि आपल्या कामगिरीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी अनेक जिल्हा व तालुका कमिट्यांच्या बैठका होऊ शकल्या नाहीत. त्या घेऊन पक्षाच्या एकंदरीत असमाधानकारक कामगिरीचा सखोल आढावा घेणे आणि सुधारणेसाठी तातडीने पावले टाकणे अत्यावश्यक आहे.

या विधानसभा निवडणूक प्रचार मोहिमेत पक्षाचे केंद्रीय नेते सीताराम येचुरी, वृंदा करात, हन्नन मोल्ला, निलोत्पल बसू, मोहम्मद सलीम, सुभाषिनी अली आणि जितेंद्र चौधरी यांनी अनेक मतदारसंघांत चांगल्या जाहीर सभा घेतल्या याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

## पुढील कार्ये

विधानसभा निवडणुकीच्या या अहवालाच्या आधारावर पक्षाची राज्य कमिटी पुढील कार्ये निर्धाराने अमलात आणण्याचे आवाहन महाराष्ट्रातील संपूर्ण पक्षाला करीत आहे.

१) पक्षाच्या स्वतंत्र जनसंघर्षांना व राजकीय मोहिमांना सर्वाधिक प्राधान्य द्यावे. त्यात कामगार, शेतकरी, शेतमजूर व इतर श्रमिक जनतेचे जिव्हाळ्याचे स्थानिक प्रश्न धसास लावण्यावर भर देणे.

२) केंद्रात आणि राज्यात आता कॉर्पोरेट्सचा संपूर्ण पाठिंबा असलेल्या धर्मांध भाजपची सत्ता असल्याने या धोक्याचा राजकीय, वैचारिक आणि संघटनात्मक असा जोरदार मुकाबला करणे.

३) महाराष्ट्र लोकशाही समिती जनतेच्या ज्वलंत प्रश्नांवर संघर्षरत ठेवण्याचा अधिकाधिक प्रयत्न करणे आणि समितीने ठरविलेल्या आंदोलनांत व कार्यक्रमांत पक्षाने हिरीरीने भाग घेणे.

४) दलित, आदिवासी व अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक-सामाजिक प्रश्नांवर चळवळी उभारून या उपेक्षित समाजघटकांना पक्षाजवळ आणण्याचे खास प्रयत्न करणे.

५) विद्यार्थी, युवक व महिला आघाड्यांच्या जलद व सातत्याच्या विकासावर विशेष लक्ष देणे.

६) शिबिरांतून, स्वतःच्या वाचनातून आणि राजकीय जाहीर सभांमधून आपल्या कार्यकर्त्यांचे व जनतेचे राजकीयीकरण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणे. त्यासाठी पक्ष मुखपत्रे व पक्ष साहित्याचा खप वाढविणे.

७) अखेरचे पण सर्वात कळीचे कार्य म्हणजे पक्ष संघटना अनेकपट जास्त बळकट करण्यासाठी सुनियोजित प्रयत्न करणे. आगामी पक्ष अधिवेशनांचा त्यासाठी योग्यरित्या उपयोग करणे.

□□□

---

## (मोदींची घोषणा वल्गनाच!...पान ११ वरून)

सर्वोच्च न्यायालयाने दिलेले हे सर्व निर्देश अभूतपूर्व असे आहेत आणि मोदी सरकार परदेशात काळा पैसा ठेवणाऱ्या साठेबाजांना निर्लज्जपणे पाठीशी घालत असल्याने द्यावे लागले आहेत. निवडणुकीत भारतातल्या कॉर्पोरेट शहांनी मोदींचे चिअरलीडर म्हणून काम केले. पंतप्रधानांच्या प्रत्येक शब्दाचे नाचून स्वागत केले ते आजही करत आहेत. या थैलीशहांनी मोदींच्या प्रचारासाठी आपल्या थैल्या खुल्या केल्या होत्या. त्या अमूल्य मदतीची परतफेड करायची वेळ आलेली दिसते. त्यासाठीच परदेशातील बँकांमध्ये साठवलेल्या काळ्या पैशावर मोदी सरकारने आपले कृपाछत्र उघडून धरले आहे.

मोदी आणि भाजपने निवडणुकीत दिलेली वचने आणि केलेल्या भीमगर्जना आठवा. परदेशातील काळा पैसा परत आणण्याची घोषणा तर ते किती उच्चरवाने करीत. त्या काळच्या वृत्तपत्रांवर ओझरती नजर टाकली तरी काय दिसते पहा:

★परदेशी बँकांतील काळा पैसा परत आणल्यास भारतातल्या प्रत्येक गरिबाच्या खिशात तीन लाख रुपये पडतील.

★ तुम्ही मला आशीर्वाद आणि संधी द्या; मी काळा पैसा परत आणीन.'

★ परत आणलेला पैसा नोकरदारांच्या पगारासाठी वापरू. त्यांच्या देशभक्तीचा सन्मान केलाच पाहिजे. आपण काळा पैसा परत आणत नाही तोपर्यंत ही चोरी चालूच राहील. प्रत्येक चोराला धडा शिकवायचा असेल तर हा सर्व काळा पैसा परत आणलाच पाहिजे.'

★ परदेशी बँकांमधील रुपया न रुपया मी शक्य असेल त्या मार्गाने परत आणीन आणि देशातील गरिबांच्या पुनर्वसनासाठी त्याचा वापर करीन.

★ 'लालकृष्ण अडवाणी यांनी वयोवृद्ध असतानाही काळ्या पैशाबद्दल जाणीव जागृती करण्यासाठी यात्रा आयोजित केली. बाबा रामदेव यांनी देखील हा प्रश्न हाती घेतला आहे. भाजपसुद्धा या प्रश्नावर लढत असून काँग्रेस पक्ष त्यावर मैदानात यायला घाबरत आहे.'

★ परदेशी बँकात किती संपत्ती साठली आहे. पण केंद्र सरकारने तो काळा पैसा परत आणण्यासाठी काहीही केलेले नाही. त्या सरकारलाही काहीतरी दडवायचे आहे. लोक उपाशी आहेत व सरकारला त्याची पर्वा नाही.

ही होती मोदींची भाषणबाजी आणि तिचा खोटेपणा उघड झाला सुप्रीम कोर्टात. या सरकारवर विश्वास कसा ठेवावा ? हे सरकार आपली वचने पाळील कशावरून ? निवडणुकीच्या काळात केवळ लोकांना भुलविण्यासाठी अशा घोषणांचा पाऊस पाडण्यात आला. लोकांनाही वाटले, मोदींच्या नेतृत्वाखालील सरकार त्या अंमलात आणील.

मोदी सरकार त्याबाबत काहीच करत नाही. दुसरीकडे मात्र धर्माच्या आधारे जनतेत ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न जोरात चालू आहे. ते हिंदुत्ववादी व्होटबँकेचे राजकारण आजवरचे सर्वात घाणेरडे राजकारण आहे. हे सैतानी कारस्थान यशस्वी होता कामा नये. त्याच्या पराभवानेच भारतातील शोषितांच्या मुक्तीचा रस्ता खुला होईल. आज बहुसंख्य लोक दयनीय अवस्थेत जगत आहेत. त्यात चांगला बदल करण्यासाठी या सरकारविरुद्ध जनतेने एकजूट करून लढायला हवे.

□□□

# 'काळा पैसा परत आणतो' मोदींची घोषणा शेवटी वल्गनाच!

**माया पंडित**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी आपण अजून विसरलेले नाही आहोत. कॉर्पोरेट शहांनी पुरवलेल्या विमानात बसून नरेंद्र मोदींनी संचार केला आणि आकाशवाणी केल्याप्रमाणे देशातील जनतेवर आश्वासनांची आणि घोषणांची बरसात केली. त्यावेळी ते पंतप्रधानपदाचे उमेदवार होते. आता पंतप्रधान झाल्यावर त्या सर्व घोषणा पोकळ ठरू लागल्या आहेत. कॉर्पोरेट शहांच्या जेट विमानाला वचनांचे रंगीबेरंगी फुगे लावून जनतेला भुलवण्यात त्यांना यश आले खरे. पंतप्रधान झाल्यावर मोदी आता स्वत:च फुगे फोडू लागले आहेत. आर्थिक जादूची कांडी फिरवून अच्छे दिन येतीलचा फुगा फुटल्याचे दिसून आले आहेच. निवडणूक प्रचारात मोदींनी अशीच एक वावडी उडवली होती. परकीय बँकांत भारतीयांनी खूप काळा पैसा दडवून ठेवला आहे तो मी परत आणीन आणि लोकांच्या भल्यासाठी त्याचा वापर करीन, ही ती वावडी.

याविषयीचा खटला उच्च न्यायालयात गेली पाच वर्षे चालू आहे. मोदी सरकारने याविषयी चालढकल केली म्हणून त्याला सर्वोच्च न्यायाधीशांनी चांगलेच फटकारले. त्यानंतर मोदी सरकारने या काळ्या पैशाचा डोंगर पोखरून तीन उंदरांची नावे कोर्टाला सादर केली. हा देखील हास्यास्पद प्रकार ठरला. त्यात नवीन काहीच नव्हते. ही तीन नावे संपुआ दोन सरकारने आधीच जाहीर केली होती. सर्वोच्च न्यायालयाने २८ ऑक्टोबर रोजी मोदी सरकारला २९ ऑक्टोबरलाच ज्यांचा तपास चालू आहे अशा सर्वांची नावे सादर करा असे खडसावले. पुढे जाऊन, देशाबाहेर काळा पैसा दडवणाऱ्यांवरच सरकार संरक्षणाची छत्री का धरत आहे असा सवाल देखील सुप्रीम कोर्टाने केला.

हा खटला मुख्य न्यायाधीश एच. एन. दत्तू यांच्या नेतृत्वाखाली चालू आहे. कोणत्याही देशाबरोबर कसलाही करार असला तरी सरकारने सर्वच्या सर्व नावे बंद लखोट्यातून २९ ऑक्टोबर रोजीच कोर्टाला द्यावीत असा आदेश दिला. हा आदेश म्हणजे सरकारला धक्काच होता. याचे कारण सरकारला नावे उघड न करायला परवानगी मिळावी असा अर्ज सरकारने सुप्रीम कोर्टासमोर केला होता. त्या अर्जावर कोर्टाने वरील आदेश दिला. मुख्य न्यायाधीशांच्या या बेंचमध्ये श्रीमती रंजना देसाई अणि श्री. मदन लोकूर हे इतर दोन न्यायाधीश आहेत. त्या तिघांनी आदेश दिला 'आम्हाला दोनतीन नावे नकोत; सर्व नावे असलेली नावे द्या.....जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड आणि इतर देशांकडून मिळालेली सर्वच्या सर्व माहिती द्या. तुम्ही सादर केले ते हिमनगाचे टोकच असू शकते. हे पहिले पाऊल आहे. सर्व उघड करा. हा प्रश्न आम्ही केवळ तुमच्या (सरकारच्या) हाती ठेवू इच्छित नाही. आमच्या कारकिर्दीत तसे होऊ देणार नाही.'

मोदी सरकारची चांगलीच पंचाईत झाली आणि त्याला जिनिव्हामधील HSBC बँकेतील ६२७ भारतीय खातेदारांची नावे कोर्टाला द्यावी लागली. असे करतानाही मोदी सरकारने काळ्या पैशावर दुहेरी करांबाबत असलेल्या करारांचे पांघरूण घालायचा प्रयत्न केलाच. त्या करारामुळे अशा लोकांची नावे जाहीर करता येत नाहीत असा बचाव सरकार करू लागले. तेव्हा देखील कोर्टाने पुन्हा सरकारला झापले.

सर्वोच्च न्यायालयाने एक गोष्ट सरकारला ठणकावून सांगितली. या प्रकरणी विशेष तपासणी करण्यासाठी एस.आय.टी. स्थापन करावी असा आदेश सुप्रीम कोर्टाने दिला होता. त्या एस.आय.टी.ला बंद लखोट्यातून माहिती देण्याच्या आड कोठलाही करार येऊ शकत नाही असे कोर्टाने सांगितले. कोर्टाने हा लखोटा स्वत: न उघडता एस. आय. टी.चे अध्यक्ष असलेल्या माजी न्यायाधीशांना सुपूर्द केला.

सुप्रीम कोर्टाने तपास कसा होईल हे आपणच ठरवू असे नि:संदिग्ध शब्दात सांगितले, तपास कसा करायचा, नावे सांगायची की नाही याच्याशी सरकारचा काहीच संबंध नाही, सरकारने केवळ सर्व माहिती कोर्टाला द्यावयाची आहे. कोर्टाच्या निर्देशानुसार सरकार तपासासाठी सीबीआयचे सहाय्यसुद्धा घेऊ शकते. कोर्टाने २०११ सालीच परकीय सरकारांकडून आलेली सर्व माहिती सादर करण्याचा आदेश दिला होता. आता त्याच्या अंतिम निर्णयापर्यंत जाण्याची जबाबदारी आमच्यावरच आहे, असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले.

कोर्टाने सरकारला धारेवर धरत प्रश्नांची सरबत्ती केली. 'तुम्हाला खरोखरच तपास करायचा आहे काय?' हा त्रास तुम्हाला नको वाटतो काय? सरकारला नेमके काय जाचत आहे? या लोकांवर कृपाछत्र का धरले आहे? तुम्ही केवळ माहिती द्यायची आहे, निर्णय आम्ही घेऊ. आम्ही सीबीआयलासुद्धा तपास करण्याचे आदेश देऊ शकतो. आम्ही हतबल नाही आहोत. मूळ आदेश आम्ही २०११लाच दिला होता आणि आजही आम्ही ती जबाबदारी घेत आहोत.'

सरकारच्या ॲटर्नी जनरलनी कोर्टाच्या आदेशात दुरुस्ती करण्याची विनंती केली. त्यावर न्यायाधीश संतापले. 'दोन देशांतील करारांमुळे नावे सांगता येत नाहीत हा युक्तिवाद तुम्ही आधीच केलेला आहे. तो तुम्हाला पुन्हा करता येणार नाही. आम्ही आमच्या आदेशातील एक शब्दही बदलणार नाही. या न्यायालयाने आधीच्या सरकारला खुल्या कोर्टात एक आदेश दिला होता. नवे सरकार आले म्हणून त्या आदेशात दुरुस्ती करावी अशी मागणी तुम्हाला करता येणार नाही.'

मोदी सरकार काही लोकांना पाठीशी घालत आहे, त्यांचे हितसंबंध लपवत आहे हे ध्यानात घेऊन सर्वोच्च न्यायालय म्हणाले, 'तुम्हाला या लोकांच्या हिताची इतकी काळजी करायचे, भंग झाला तरी कारण नाही; काय करायचे ते आम्हाला नीट समजते. या देशातला पैसा आम्हाला इतर देशांत जाऊ द्यायचा नाही. तुम्ही तुमचे सर्व म्हणणे आधीच मांडले आहे आणि न्यायालयाने सर्व माहिती उघड करायला सांगितले आहे. गुप्ततेच्या कराराचा भंग झाला तरी सर्व माहिती द्या असे न्यायालय सांगू शकते. एकदोन नावे नव्हे तर सर्व माहिती हवी आहे.'

*(पान १० पहा)*

# श्रीयुत मोदींचे दोन चेहरे!

**करण थापर**

आपल्या देशाच्या पंतप्रधानांकडून आपण कोणत्या अपेक्षा करणार ? हा काही केवळ विचारायचा म्हणून विचारलेला प्रश्न नाही तर खरोखरच आपल्या देशाचा पंतप्रधान प्रामाणिक, त्यागी, निष्ठावान असावा, बांधिलकी मानणारा असावा, प्रशासनात तज्ञ असावा, किमान बुध्दिमान असावा असे आपल्याला निश्चितच वाटत असते.

पण या सर्व गुणांबरोबर आणखीनही एका महत्वाच्या गुणाची आपण त्यांच्याकडून अपेक्षा करीत असतो तो गुण असतो विवेकशीलता. आपले पंतप्रधान जे बोलतात अगर कशाशी बांधिलकी राखतात याच्याशी आपण नेहमीच सहमत होऊ असे नाही पण आपली धारणा असते त्यांचे विचार आणि त्यांची कामे किमान विवेकी, विश्वासार्ह आणि योग्य विचारांती घेतलेली असावीत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्यांनी घेतलेले निर्णय जरी चुकीचे निघाले आणि बहुतेकवेळा ते तसे निघतातही, तरी त्यांनी किमान सामान्य ज्ञानाची पातळी राखलेली असावी.

आणि इथेच माझे श्रीयुत नरेंद्र मोदींशी भांडण आहे. गेल्या शनिवारी सर एच. एन. रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटल आणि संशोधन केंद्राच्या उदघाटनाच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रतिपादन केले, *‘महाभारतात सांगितले आहे, कर्णाचा जन्म आईच्या गर्भातून झालेला नव्हता. याचा अर्थ आहे; त्यावेळेस जेनेटीक सायन्स होते.... आपण गणेशजींची पूजा करतो, त्या काळी असा कोणीतरी प्लास्टिक सर्जन असणार ज्याने माणसाच्या शरीरावर हत्तीचे मुंडके बसवून प्लास्टिक सर्जरीची सुरुवात केली असेल.*

अनेक हिंदू, इतिहासपूर्व पौराणिक काळात भारतात जेनेटीक सायन्स होते आणि प्लास्टिक सर्जरी केली जात असे या श्रीयुत मोदींच्या प्रतिपादनाशी सहमत असतील यात काहीच शंका नाही. अर्थात व्यक्तिगतरित्या त्यांना जे वाटते त्यावर विश्वास ठेवावयास ते स्वतंत्र आहेत. पण भारताचा पंतप्रधान जेव्हा अशा समजांचा सत्यगोष्टी म्हणून दावा करतो आणि तेही एका हॉस्पीटलच्या उदघाटन समारंभात तेव्हा हे काही तरी आगळेवेगळेच वाटते.

असे का वाटते ? कारण दंतकथांचा वापर आपल्या वैज्ञानिक यशाचा पाया असल्याचा दावा करण्यासाठी करणे अविवेकी आहे. एकतर हे केवळ अनुमान आहे, त्या दंतकथांच्या सत्यतेसाठी कोणताही पुरावा दिलेला नाही आणि दुसरे म्हणजे आमच्याकडे वैज्ञानिक ज्ञान होते, आम्हीही वैज्ञानिक प्रगती साधलेली होती पण ते ज्ञान गहाळ झाले एवढेच नव्हे तर प्रदीर्घ काळापर्यंत विस्मृतीत गेले अशा बढाया तुम्ही कोणत्या आधारावर मारत आहात, कारण मुळात ते तुमच्याकडे होते याचा काही तरी ठोस पुरावा तुमच्याकडे आहे काय ?

सर्वात चिंतेची बाब म्हणजे श्रीयुत मोदी दीनानाथ बात्रांच्या दृष्टीकोनाची री ओढत आहेत. बात्रांची पुस्तके आता गुजरातमधील ४२,००० शाळांच्या अभ्यासक्रमांची भाग बनली आहेत. कुंती आणि कौरवांच्या काळात स्टेम सेलवरचे संशोधन ज्ञात होते, महाभारत काळात टी. व्ही.चा शोध लागला होता, वैदिक काळात मोटार गाड्या होत्या या दाव्यांना काहीजणांनी मूर्खपणा संबोधले. मग भारतात इतिहासपूर्व काळातच जेनेटीक सायन्स होते किंवा प्लास्टिक सर्जरी केली जात होती या दाव्यांनाही असेच का संबोधायचे नाही ?

मला आणखी दोन मुद्दे मांडायचे आहेत. एक, श्रीयुत मोदी स्मार्ट शहरांची उभारणी, अत्याधुनिक शिक्षणावरील भर, मंगळ मोहीमेच्या यशस्वितेबद्दलचा अभिमान, डिजिटल भारत, बुलेट रेल्वेची आयात, मेक इन इंडिया, शस्त्रात्र निर्मिती वगैरे बाबत खूपच बोलत असतात. या सगळ्या २१व्या शतकातील आकांक्षा आहेत. मग या सगळ्याचा मेळ पुराव्याने सत्यसिध्द नसलेल्या दंतकथांशी कसा काय बसतो ? ही विसंगती नाही काय ?

दुसरा मुद्दा आहे, ग्रीक पुराणात सेंटॉरस आणि मिनोटॉरस, पार्शियाच्या पुराणात ग्रिफीन, ब्रिटीशांच्यात युनिकॉर्न आणि परिकथांत मेरमेडस् आणि वेअरवुल्व्हस् अशा प्राण्यांचे वर्णन आहे. श्रीयुत मोदींच्या भूमिकेतून आपल्याला हे सर्व प्राणी प्रत्यक्षात अस्तित्वात होतेच असे मानावे लागेल. पण खरेच कोणी त्यांचे अस्तित्व मान्य करेल ? हो! नक्कीच... फक्त आपल्या स्वप्नात किंवा आपण मूल असण्याच्या काळात ?

पंतप्रधानांच्या या प्रतिपादनाबाबत माझ्या मनात आणखी एक प्रश्न निर्माण झाला जो सर्वात कळीचा आहे. घटनेच्या कलम ५१ए(एच) प्रमाणे वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. आणि तरीही पंतप्रधान कोणताही ठोस पुरावा नसलेल्या दंतकथांच्या आधारे आंधळेपणाने प्राचीन काळातील वैद्यकीय प्रगतीचा दावा कसा काय करू शकतात ? हे मला कळू शकत नाही. पंतप्रधानांचा हा दृष्टीकोन स्पष्टपणे आणि निर्विवादपणे घटनेशी विसंगत आहे. खरेतर श्रीयुत मोदींनीही याचा विचार केला तर मला वाटते तेही याच्याशी असहमत होणार नाहीत.

हे सर्व अस्वस्थ करणारेच आहे आणि पंतप्रधानांच्या संदर्भात तर ते अधिकच चिंताजनक आहे. पण आपल्या प्रसारमाध्यमांनी मात्र याकडे फारसे लक्ष दिले नाही आणि मला हे फारच निराशाजनक वाटले. तसेच कोणत्याही भारतीय शास्त्रज्ञांनीही पंतप्रधानांच्या या दाव्यांबद्दल काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही, याचेही मला खूपच आश्चर्य वाटले. त्यांचे मौन अस्वस्थ करणारे आहे. माध्यमांचे मौन तर फारच अस्वस्थ करणारे आहे. असे वाटते जणूकाय प्रत्येकानेच याकडे दुर्लक्ष केले आहे.

***(करण थापर यांचा ‘द हिंदू’ या वर्तमानपत्रातील ‘द टू फेसेस ऑफ मि. मोदी’ या लेखाचा राजीव देशपांडे यांनी केलेला स्वैर अनुवाद. करण थापर हे प्रसिध्द टी. व्ही. समालोचक व हेडलाईन्स टूडे प्रोग्राम आणि टू द पॉईंट या कार्यक्रमांचे समन्वयक आहेत.)***

□□□

# डाव्या पक्षांच्या बैठकीत ८ ते १४ डिसेंबरच्या मोहिमेची हाक

सीपीआयएम, सीपीआय, आरएसपी, फॉर्वर्ड ब्लॉक, सीपीआय(एमएल-लिबरेशन) आणि सोशलिस्ट युनिटी सेंटर ऑफ इंडिया (कम्युनिस्ट) या सहा डाव्या पक्षांची नवी दिल्ली येथे बैठक झाली. त्या बैठकीनंतर प्रसृत करण्यात आलेले निवेदन खालीलप्रमाणे :

मोदी सरकार केंद्रात सत्तेत आल्यापासून कॉर्पोरेट-हिंदुत्ववाद्यांच्या पाठिंब्यामुळे उजव्या शक्ती अत्यंत आक्रमक झालेल्या आहेत. लोकांच्या जीवनमानावर अतिशय घातक परिणाम करणारी नवउदारवादी धोरणे जनतेवर लादली जात आहेत. जनता महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराचे चटके सोसतच आहे.

हिंदुत्ववादी शक्तींच्या आक्रमक धर्मांध कारवायांत वाढ झालेली आहे. मोदी सरकारचे पालक असलेले आरएसएस आणि त्याच्या अनुषंगिक संघटना शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांत आपला धर्मांध कार्यक्रम राबविण्याच्या प्रयत्नाला जोरदारपणे लागल्या आहेत. देशाच्या वेगवेगळ्या भागात धर्मांध तणावांत प्रचंड वाढ झालेली आहे.

डाव्या पक्षांनी ८ ते १४ डिसेंबर या आठवड्याभरात खालील मुद्यांवर निषेध मोहीम चालविण्याचा निर्णय घेतलेला आहे :

१) मनरेगाच्या अनुदानात करण्यात येत असलेली कपात व कायद्यात करण्यात येत असलेल्या बदलांविरोधात,

२) महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी, औषधांच्या वाढलेल्या अवास्तव किंमतींविरोधात,

३) विमा व्यवसायातील विदेशी भांडवलाचे प्रमाण वाढविण्याच्या विरोधात,

४) काळा पैसा उघडकीस आणण्यासाठी कडक कारवाई करा,

५) शिक्षण, सार्वजनिक माध्यमे आणि इतर संस्थांमध्ये आरएसएस व हिंदुत्ववादी विचारसरणी लादण्यांच्या प्रयत्नांच्या विरोधात,

*६) लव्ह जिहाद* आणि इतर द्वेष पसरवणाऱ्या प्रचारास आळा घाला,

७) अल्पसंख्यांक आणि त्यांच्या हक्कांवर होणारे हल्ले थांबवा,

८) दलितांवर होणाऱ्या जातीय अत्याचारांच्या विरोधात संघर्ष.

देवब्रत बिश्वास(एआयएफबी), किश्ती गोस्वामी आणि मनोज भट्टाचार्य (आरएसपी), स्वपन मुखर्जी आणि कविता कृष्णन (सीपीआय-एमएल)-लिबरेशन, माणिक मुखर्जी आणि रणजित धर सीयुसीआय(सी), ए.बी. बर्धन आणि डी. राजा (सीपीआय) आणि प्रकाश करात व एस. रामचंद्रन पिल्ले सीपीआय-एम) हे नेते या सभेला हजर होते.

**१ नोव्हेंबर २०१४**

# जनतेवरील वाढत्या आर्थिक भाराचा प्रतिकार करा!

## पॉलिटब्यूरो निवेदन

माजी संपुआ सरकार ज्या जनविरोधी नवउदारवादी आर्थिक सुधारणा अंमलात आणत होते, त्याच सुधारणा मोदी सरकार अंमलात आणणे चालूच ठेवणार असल्याचे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले. उलट या सुधारणांची अंमलबजावणी जास्त आक्रमकतेने करण्यासाठी हे सरकार सज्ज झाले आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज यांनी आयोजित केलेल्या भारत आर्थिक परिषदेच्या उदघाटनाच्या सत्रात बोलतांना अर्थमंत्री म्हणाले, त्यांच्या सरकारने सुधारणांच्या प्रदीर्घ प्रवासाची सुरुवात केलेली आहे. त्यांनी सांगितले, सरकार ई-लिलावाव्दारे खाणपरवान्यांच्या वाटपासाठी नवीन नियम तयार करत आहे. कोळशाशिवायच्या खनिजांच्या खाणी खासगी गुंतवणूकदारांना खुल्या करण्यात येणार आहेत. कोळसा खाणी संसदेच्या विधेयकाव्दारे राष्ट्रीयीकृत करण्यात आलेल्या आहेत. भारताच्या ह्या समृध्द खाणींचा स्त्रोत सार्वजनिकरित्या उपयोगात आणून देशातील रोजगाराच्या आणि आर्थिक वाढीसाठी त्याचा विकास करण्याऐवजी ह्या खाणी खासगी फायद्यासाठी दिल्या जात आहेत. संरक्षण, रेल्वे आणि स्थावर मालमत्ता क्षेत्रात विदेशी गुंतवणूक सहज सुलभ केली जाणार असल्याचे तेथेच त्यांनी जाहीर केले.

मनरेगामध्ये कपात करण्याबरोबरच अर्थमंत्र्यांनी अशीही माहिती दिली की, स्मार्ट सिटीची उभारणी करण्यासाठी खासगी शाळा, इस्पितळे, हॉटेले वगैरेसाठी जमीन ताब्यात घेता यावी म्हणून जमीन अधिग्रहण कायद्यात सुधारणा करण्याचे सरकारने ठरविले आहे. यामुळे भारतीय शेतकऱ्यातील मोठ्या विभागावर आणखी बोजा पडून त्याचे जीवनमान आणखीनच खालावणार आहे. त्यामुळे आधीच जेरीला आलेला शेतकऱ्यांच्या निराशेमुळे होणाऱ्या आत्महत्यांची संख्या वाढण्याचीच शक्यता आहे.

मोदी सरकार आंतरराष्ट्रीय भांडवलाला जास्तीत जास्त फायदा होईल असे विभाग उपलब्ध करून देईल अशी माहिती देत भारत जागतिक व्यापार संघटनेला जास्तीत जास्त व्यापार सुविधा उपलब्ध करून देईल असे सांगून अर्थमंत्री म्हणाले, या मुद्याला सरकारचा तात्विक विरोध अजिबात नाही. अनुदानाच्या योग्य वाटपाच्या नावावर अगोदरच किरकोळ असलेली गरिबांसाठीची अनुदाने आणखीनच कमी करण्याच्या विचारात मोदी सरकार आहे

या सुधारणांचा परिणाम आधीच पिचत असलेल्या जनतेच्या मोठ्या विभागावर फारच घातकपणे होणार आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन तोंडावर आलेले असताना होत असलेल्या या घोषणांशी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्युरो पूर्णत: असहमती व्यक्त करीत आहे व आपल्या जनतेच्या जीवनमानावर प्रचंड आर्थिक बोजा टाकणाऱ्या या आर्थिक धोरणांविरोधात लोकांचे लढे अधिकाधिक तीव्र करण्याचे आवाहन करीत आहे.

**७ नोव्हेंबर २०१४**

# सरकारी खर्चात १० टक्के कपात

अर्थ मंत्रालयाने सरकारच्या योजनांव्यतिरिक्त खर्चात या आर्थिक वर्षात दहा टक्के कपात करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या काटकसरीच्या उपाययोजनेत फक्त प्रथम वर्ग विमान प्रवासावर बंदी अगर पंचतारांकित हॉटेलमधील बैठका यावरच बंदी घातलेली नसून या उपाययोजनेचा जास्त भर अनुदानातील कपात हा आहे. याचा अर्थ या उपाययोजनांचा परिणाम जनतेला आणि जनतेच्या कल्याणकारी योजनांना सोसावा लागणार आहे.

या कपाती कोणकोणत्या योजनांत होणार आहेत या बाबतीत सरकारने स्वत:च पुढे येऊन खुलासा केला पाहिजे. जनतेच्या कल्याणकारी योजनांत होणाऱ्या कोणत्याही कपातींना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्युरो ठामपणे विरोध करेल.

**३१ ऑक्टोबर २०१४**

# पुणे : वसतीगृहाच्या प्रश्नांसाठी एसएफआयचे ठिय्या आंदोलन

पुणे शहरामध्ये आदिवासी मुलांसाठी मांजरी, शेवाळवाडी, येवलेवाडी, हडपसर, कोरेगांव पार्क व काळेवाडी फाटा या सहा ठिकाणी वसतीगृहे आहेत. हडपसर व कोरेगांव पार्क ही दोन वसतीगृहे सोडून बाकी सर्व महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर आहेत. अंतर जर पाहिले तर सर्व वसतीगृहे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सांगवी, आकुर्डी, पिंपरी, चिंचवड, औंध, ताथवडे, तसेच पुणे शहराचा महाविद्यालय केंद्रित असणारा भाग येथे विद्यार्थ्यांना सोईस्कर नाहीत. तर कोरेगाव पार्कची विद्यार्थी क्षमता कमी आहे. त्यामुळे एसएफआयची सातत्याने मागणी होती, की पुणे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी वसतीगृह चालू करण्यात यावे.

त्यानुसार गेल्या वर्षी काळेवाडी, पुणे हे वसतीगृह सुरू करण्यात आले. हे वसतीगृह विद्यार्थ्यांना अत्यंत सोईस्कर आहे. कारण बहुतांशी विद्यार्थ्यांची महाविद्यालये वसतीगृहाच्या जवळ आहेत. परंतु येथील वसतीगृह केशवनगर येथे महाविद्यालयांपासून जास्त अंतर असलेल्या ठिकाणी हलवण्यासाठी प्रकल्प प्रशासन व प्रकल्प अधिकारी यांनी अट्टाहास धरून विद्यार्थ्यांचे हाल करण्यात आले. वसतीगृह प्रशासनाकडून आठ दिवस वसतीगृहाची मेस व वसतीगृहाचे पाणी बंद करण्यात आले. बहुतांशी खोल्यांची वीज खंडित करण्यात आली. या संदर्भात प्रकल्प अधिकारी यांच्याशी संपर्क केला असता, 'तुम्हाला काय करायचे ते करा', अशा प्रकारची उत्तरे विद्यार्थ्यांना देण्यात आली.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी वसतीगृह असले पाहिजे, वसतीगृहाची मेस, वसतीगृहाचा पाणी पुरवठा व वीज पुरवठा नियमित करण्यात यावा, तसेच सर्व वसतीगृहांची विद्यार्थी संख्या वाढवा, सुट्टी संपली तरी वसतीगृहे सुरू झाली नाहीत, ती त्वरित सुरू करण्यात यावीत, या मूलभूत मागण्यांसाठी ३ नोव्हेंबर २०१४ रोजी एस.एफ.आय.च्या वतीने आदिवासी प्रकल्प कार्यालय, घोडेगांव येथे आंदोलन करण्यात आले.

या वेळी प्रकल्प अधिकारी व सहाय्यक प्रकल्प अधिकारी अनुपस्थित होते. प्रकल्प प्रशासनाने आंदोलनाची दखल न घेतल्यामुळे प्रकल्प अधिकारी यांचा पुतळा त्यांच्या खुर्चीवर ठेवून प्रकल्प कार्यालय व तेथील रस्त्यावरून धिंड काढण्यात आली आणि कार्यालयासमोर पुतळ्याचे दहन करण्यात आले. यानंतर कार्यालयीन अधिक्षकांनी निवेदन स्वीकारले व चर्चा करण्यात आली. 'मी काही निर्णय घेऊ शकत नाही', असे अधिक्षकांनी सांगितल्यावर एसएफआयच्या कार्यकर्त्यांनी त्यांना स्पष्ट शब्दात सांगितले की, जोपर्यंत प्रकल्प अधिकारी येऊन काही निर्णय घेणार नाहीत, तोपर्यंत आम्ही त्यांच्या केबिनमधून हलणार नाही. कडाक्याच्या थंडीत उबदार कपड्यांची सोय नसताना कार्यकर्त्यांनी रात्री प्रकल्प अधिकाऱ्यांच्या केबिनमध्येच मुक्काम ठोकला.

४ नोव्हेंबर रोजी दिवसभर कार्यकर्ते केबिनमध्ये असूनही प्रकल्प अधिकारी तेथे आले नाहीत. उलट फोनवरून कार्यकर्त्यांना ते धमकी देत होते. रात्री ११.३० वाजता प्रकल्प अधिकारी प्रकल्प कार्यालयामध्ये आले आणि चर्चा करा असे ते म्हणाले. आम्ही एवढ्या रात्री चर्चा करणार नाही, सकाळी चर्चा करू' असे एसएफआयच्या कार्यकर्त्यांनी त्यांना ठणकावून सांगितले; त्यानंतर ते निघून गेले. रात्री १ वाजता प्रकल्प अधिकारी पुन्हा परतले व त्यांनी उपस्थित पोलिसांना कार्यकर्त्यांना अटक करण्यास सांगितले. त्यांस कार्यकर्त्यांनी साखळी करून जोरदार प्रतिकार केला आणि जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे पोलिसांना कार्यकर्त्यांना अटक करता आले नाही.

५ नोव्हेंबरच्या सकाळी आंदोलकांनी आतून कार्यालयाचे गेट बंद करून घेतले आणि जोपर्यंत प्रकल्प अधिकारी चर्चेस येत नाहीत, तोपर्यंत गेट उघडणार नाही, असा इशारा दिला. पोलिसांनी बळाचा वापर करून गेट खोलण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचा तो बेत फसला. जुन्नर, आंबेगाव, पुणे येथून अजून कार्यकर्ते येऊन आंदोलनात सहभागी झाले. शेवटी प्रकल्प अधिकारी चर्चेस तयार झाले आणि कार्यकर्त्यांनी गेट उघडले. मागण्यांपैकी दोन प्रश्न सुटल्यानंतर राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी हस्तक्षेप करून चर्चा फिस्कटवली व प्रकल्प अधिकाऱ्यांना घेऊन तो आत गेला.

पोलिसांनी तत्काळ गेट बंद केल्यामुळे कार्यकर्त्यांनी गेटसमोरच ठाण मांडले. 'प्रकल्प अधिकारी यांची गाडी गेटमधून बाहेर जाईल; नाही तर आम्ही पोलिसांच्या गाडीतून पोलीस स्टेशनात जाऊ; परंतु प्रश्न सुटल्याशिवाय आम्ही इथून हलणार नाही', अशी ठाम भूमिका यावेळी घेण्यात आली. अखेर पुण्यावरून डीवायएसपी आले आणि त्यांनी मध्यस्थी करून चर्चा घडवून आणली. या चर्चेप्रमाणे प्रकल्प अधिकारी यांनी १५ दिवसांत विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार वसतीगृह शोधण्याची जबाबदारी घेतली. तसेच मेस, पाणी, लाईट त्वरित सुरू करण्यात येईल. सफाई कर्मचारी आठवड्यातून ४ दिवस वसतीगृह परिसर स्वच्छ करतील. बेडिंगच्या साहित्याचा प्रस्ताव पाठवला जाईल, जुन्नर येथील वाढीव विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या अनुषंगाने वरिष्ठ कार्यालयाला प्रस्ताव पाठवला जाईल, अशा सर्व मागण्या यावेळी मान्य करण्यात आल्या.

या आंदोलनामध्ये पुणे शहर, जुन्नर व आंबेगांव तालुका समितीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलनाचे नेतृत्व एस.एफ.आय. पुणे जिल्हा समितीचे अध्यक्ष गणपत घोडे, सचिव सोमनाथ निर्मळ, सहसचिव संजय साबळे व विलास साबळे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर साबळे यांनी केले. यावेळी जिल्हा समिती सदस्य सोमनाथ ढेंगळे, लक्ष्मण जोशी, सुनिल कोरडे, ज्ञानेश्वर शेळके, अविनाश गवारी तसेच महेंद्र लहामटे, बाळू दिघे, पंढरीनाथ पोपेरे, युवराज कोरडे, विजय इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

आंदोलनाच्या शेवटच्या दिवशी एसएफआयचे माजी राज्य सचिव डॉ. महारुद्र डाके आणि पुणे जिल्हा माजी सहसचिव व किसान सभेचे पुणे जिल्हा सचिव डॉ. अमोल वाघमारे यांनी आंदोलनास भेट देऊन कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. तसेच किसान सभा जुन्नर तालुका सचिव विश्वनाथ निगळे, आंबेगांव तालुका सचिव अशोक पेकारी, आदिवासी अधिकार मंचाचे राजू घोडे हे ही उपस्थित होते.

**– सोमनाथ निर्मळ**